भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२२१ ■ शुक्रवार १५ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## नीट पेपरफुटीप्रश्नी सीबीआयची देशभरात कारवाई सहा संशयित अटकेत, राज्यातील दोघांचा समावेश

**नवी दिल्ली, दि. १४ : वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी नीट परीक्षा पेपरफुटीच्या सावटाखाली आली आहे. या प्रकरणाचा तपास आता केंद्रीय अन्वेषण विभागाने अत्यंत वेगाने सुरू केला आहे. आतापर्यंत देशभरातून एकूण सहा मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून त्यात महाराष्ट्रातील नाशिक आणि अहिल्यानगरमधील तरुणांचा समावेश आहे. सीबीआयने जयपूर, गुरुग्राम, नाशिक आणि अहिल्यानगर अशा विविध ठिकाणांहून अनेक आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत त्यात नाशिकचा शुभम खैरनार हा बी.ए.एम.एस.च्या तिसऱ्या वर्षात शिकणारा या साखळीतील महत्त्वाचा दुवा मानला जात आहे.**



जयपूर पोलिस ठाण्यातून बाहेर पडताना सीबीआयचे विशेष पथक

अहिल्यानगर मधील धनंजय लोखंडे पुण्यात वास्तव्यास असताना त्यानेच शुभमला कुरिअरद्वारे प्रश्नपत्रिका पोहोचवली होती. राजस्थान मधील मांगीलाल बिवाल, विकास बिवाल आणि दिनेश बिवाल यांनी तेथील वितरणाचे जाळे हाताळल्याचा संशय आहे. गुरूग्राम मधील यश यादव याचा हरियाणा मधील व्यवहारांमध्ये याचा मोठा सहभाग समोर आला आहे.

सीबीआयच्या तपासात असे उघड झाले आहे की, धनंजय लोखंडे याने कुरिअरद्वारे प्रश्नपत्रिका शुभम खैरनारला पाठवली. शुभमने ही प्रश्नपत्रिका दहा लाख रुपयांना **(पान ४ वर)**

## व्हीडी सतीशन होणार केरळचे नवे मुख्यमंत्री



तिरूअंतपुरम, दि. १४ : काँग्रेस नेते व्ही. डी. सतीशन (वय ६१) हे केरळचे मुख्यमंत्री असतील. निकाल जाहीर झाल्यानंतर १० दिवसांनी आज (१४ मे) काँग्रेसने ही घोषणा केली. सतीशन हे परवूर मतदारसंघाचे आमदार आहेत. केरळच्या मुख्यमंत्रीपदासाठी के. सी. वेणुगोपाल, रमेश चेन्नीथला आणि व्ही. डी. सतीशन या तीन नावांचा विचार केला जात होता. काँग्रेसच्या हायकमांडने सतीशन यांच्या नावाला मंजुरी दिली. अलाप्पुझा लोकसभा मतदारसंघाचे खासदार के. सी. वेणुगोपाल हे केरळच्या मुख्यमंत्रीपदासाठी **(पान ४ वर)**

## हायटेक सुरक्षा भेदून जैन मुनींच्या वाहनातील दहा किलो चांदीची चोरी; चोरटा साहित्य टाकून पळाला

**सोनगीर, दि.१४ (प्रतिनिधी) - सोनगीर (ता. धुळे) येथील जैन मंदिराचा पंचकल्याणक महोत्सव आटोपून कापडणे येथे मुक्कामी थांबलेल्या जैन मुनींच्या हायटेक वाहनातून अज्ञात चोरट्याने सुमारे १० किलो चांदीचे पूजेचे साहित्य लंपास केले. मात्र, पोलीस तपास आणि श्वान पथकाच्या भीतीपोटी चोरट्याने हे सर्व साहित्य सार्वजनिक ठिकाणी सोडून पळ काढला. या थरारानंतर कापडणे परिसरात चर्चेला उधाण आले असून पोलिसांनी सुटकेचा निस्वास सोडला आहे.**

सोनगीर येथे नुकताच नवनिर्मित जैन मंदिराचा पंचकल्याणक महोत्सव अमोल कीर्तीजी महाराज व अमोघ कीर्तीजी महाराज यांच्या पावन उपस्थितीत संपन्न झाला. हा सोहळा आटोपल्यानंतर महाराज कापडणे येथे मुक्कामी होते. त्यांचे वाहन गावातील झेंडा चौकात उभे करण्यात आले होते. या वाहनात महाराजांच्या पूजेची चांदीची भांडी व इतर मौल्यवान साहित्य ठेवलेले होते.महाराजांचे वाहन आधुनिक 'डिजिटल लॉकिंग सिस्टीम'ने सज्ज आहे, जे सहजासहजी उघडणे अशक्य असते. मात्र, बुधवारी रात्री सदर सिस्टीम ऑपरेट करणाऱ्या युवकाकडून अनावधानाने वाहनाचे दरवाजे पूर्णपणे लॉक झाले नाहीत. हीच संधी साधून अज्ञात चोरट्याने बुधवारी रात्री दीड वाजेच्या सुमारास वाहनातील १० किलो चांदीच्या साहित्यावर डल्ला मारला.गुरुवारी सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस येताच कापडणे गावात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तात्काळ 'हाय अलर्ट' मोडवर आले. पोलिसांनी तांत्रिक तपासासह श्वान पथकाची मदत घेण्याचे निश्चित केले.श्वान पथक आल्यास आपला माग काढत पोलीस घरापर्यंत पोहोचतील आणि गुपित उघड होईल, या भीतीने चोरटा हादरला व या धास्तीपोटी चोरट्याने चोरलेले सर्व साहित्य एका गोणपाटात भरून सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर टाकून दिले. शोधमोहीम सुरू असतानाच हे गोणपाट पोलिसांच्या हाती लागले, ज्यात सर्व चांदीचे **(पान ४ वर)**

## धुळे शहरातील विजेचा खेळखंडोबा वाढल्याने संताप आ.अग्रवालांनी बैठक घेऊन अधिकाऱ्यांना दिले निर्देश

**धुळे, दि.१४ - शहरातील देवपूरसह विविध भागांमध्ये काही दिवसांपासून सातत्याने वारंवार खंडित वीजपुरवठ्याची समस्या वाढली आहे. आधीच उन्हाच्या तीव्रतेसह रात्रीच्या वाढत्या उकाड्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना वेळी-अवेळी होणाऱ्या खंडित वीजपुरवठ्यामुळे विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. यातून नागरिकांमध्ये रोष वाढून वादाचे प्रसंगही उद्भवत आहेत. या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागांत वारंवार होणारी खंडित वीजपुरवठ्याची समस्या त्वरित निकाली काढा. त्यासाठी दोन दिवसांतच तातडीने अतिरिक्त वीज रोहित्रे उभारणीसह अन्य उपाययोजना करा, असे निर्देश शहराचे आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी आज दिले.**



दरम्यान, धुळे शहरातील वाढत्या खंडित वीजपुरवठाप्रश्नी आमदार अग्रवाल यांनी दोन दिवसांपूर्वीच मुंबईत राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांना निवेदन देत शहरासाठी अतिरिक्त रोहित्रांची मागणी केली. त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश राज्यमंत्री बोर्डीकर यांनी वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिले. **(पान ४ वर)**

## सोनगीरच्या चोरीत दोन लाखांचे ऐवज लंपास

सोनगीर दि. १४(प्रतिनिधी) - येथील मण्यार गल्ली परिसरात एका घरातून अज्ञात चोरट्यांनी पहाटेच्या सुमारास १४ ग्रॅम सोने आणि १५ हजार रुपयांची रोकड असा एकूण सव्वा दोन लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना गुरुवारी (दि. १४) पहाटे ५ ते ५:३० वाजेच्या सुमारास घडली असून, यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मण्यार गल्लीत वास्तव्यास असलेले अजीम शेख इकबाल हे पेशाने मौलाना असून ते मशिदीत अजान आणि धार्मिक शिक्षण देण्याचे काम करतात. गुरुवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास ते गुजर गल्लीतील जामा **(पान ४ वर)**

## डाबली-धांदरणे पाण्याअभावी तहानले शिंदेखडा ता.टँकरने पाणी पुरवठा

**शिंदखेडा, दि.१४ (प्रतिनिधी) - शिंदखेडा तालुक्यातील डाबली व धांदरणे या गावांमध्ये उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईने गंभीर स्वरूप धारण केले असून, नागरिकांना पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत आहे.या दोन्ही गावातील महिलांना विहिरीत उतरून पाणी भरावे लागत असल्याचे चित्र समोर आले असून, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.**



सुमारे पाच हजार लोकसंख्या असलेल्या या गावांमध्ये दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या गंभीर होते. पावसावर अवलंबून असलेल्या या भागात पाऊस चांगला झाल्यास काही प्रमाणात वर्षभर पाणी उपलब्ध असते, मात्र यंदा उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणी टंच झाले आहे. सध्या प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असला तरी तो अपुरा ठरत असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. डाबली गावाला आठ दिवसाआड, तर धांदरणे गावाला तीन दिवसाआड पाणी पुरवठा होत असल्याचे सांगण्यात येते. टँकर सुरू करण्यासाठी ग्रामस्थांना पंचायत समिती व तहसील कार्यालयाचे अनेक वेळा उंबरठे झिजवावे लागल्याचा आरोपही करण्यात आला आहे.विशेषतः आदिवासी वस्तीतील महिलांना पाण्यासाठी लांब अंतर पार **(पान ४ वर)**

## दिव्यांगानचे पेन्शन रखडल्याने आंदोलन

धुळे, दि. १४ - संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अंतर्गत राज्यातील हजारो दिव्यांग बांधवांची हक्काची पेन्शन तांत्रिक कारणांमुळे रखडली आहे. काही दिव्यांगांच्या खात्यात पैसे जमा झाले असले, तरी बहुतांश दिव्यांग बांधव अद्यापही मानधनापासून वंचित आहेत. शासनाच्या ढिसाळ कारभारामुळे आणि क्लिष्ट नियमांमुळे दिव्यांग बांधवांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असून, प्रशासनाने यावर तात्काळ तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन करु असे भाजप दिव्यांग विकास आघाडीचे माजी प्रदेश सदस्य महेश काटकर यांनी केली आहे.

## सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांसाठीच्या गाव विकासासाठी चार को.नव्वद ला.मंजूर

**नंदुरबार, दि.१४ (प्रतिनिधी) - नंदुरबार जिल्ह्यातील सरदार सरोवर प्रकल्पग्रस्त पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, शहादा तालुक्यातील चिखली, वाडी आणि कुकावल या पुनर्वसन गावठाणांमध्ये विविध विकासकामांसाठी तब्बल ४ कोटी ९० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.**

महसूल व वन विभागाच्या मदत व पुनर्वसन शाखेच्या शासन निर्णयानुसार सरदार सरोवर प्रकल्पातील पुनर्वसित गावठाण क्र. १० चिखली, गावठाण क्र. ९ वाडी आणि गावठाण क्र. १२ कुकावल येथे नागरी सुविधा उभारण्यात येणार आहेत. या अंतर्गत आर.सी.सी. गटारी बांधकाम, संरक्षण भिंतींची उभारणी तसेच अंतर्गत रस्ते विकासाची कामे करण्यात येणार आहेत.

मंजूर कामांमध्ये चिखली गावठाणात विविध भागांमध्ये आर.सी.सी. गटारी बांधकाम, वाडी गावठाणात पोसल नदीलगत संरक्षण भिंतींची उभारणी तसेच कुकावल गावठाणात अंतर्गत रस्ते बांधकामाचा समावेश आहे. एकूण ४९ विकासकामांसाठी प्रत्येकी १० लाख रुपयांप्रमाणे निधी मंजूर करण्यात आला आहे.

## जिल्हा पोलिस दलातर्फे तक्रार निवारण दिन

नंदुरबार,दि.१४ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये नागरिकांच्या काही तक्रारी व समस्या असल्यास त्यांचे तत्काळ निवारण व्हावे, नागरिकांचा वेळ वाचावा तसेच पोलिसांशी संवाद वाढावा या उद्देशाने जिल्हा पोलिस दलातर्फे प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिन आयोजित करण्यात येणार आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, शनिवार दि. १६ मे २०२६ पासून महिन्याच्या प्रत्येक शनिवारी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये **(पान ४ वर)**

## छ. संभाजी महाराज जयंती उत्सव उत्साहात संपन्न अभिषेक, रक्तदान, सत्कार : आ.अग्रवालांची उपस्थिती

**धुळे, दि.१४ - छत्रपती संभाजी राजे पूर्णाकृती पुतळा निर्माण समिती तथा छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विविध सामाजिक, धार्मिक व जनजागृतीपर उपक्रमांनी कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.**



कार्यक्रमाची सुरुवात सकाळी वाजता छत्रपती संभाजी महाराजांच्या अभिषेक व माल्यार्पणाने झाली. अभिषेक सोहळा आमदार अनुप अग्रवाल यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार समारंभ तसेच समितीस सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. सकाळी साडेदहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत आयोजित रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे प्रत्येक रक्तदात्यास जीबी पेन ड्राईव्ह भेट देण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आ.प्रा.शरद पाटील, राजवर्धन कदमबांडे **(पान ४ वर)**

## पत्नीच्या खून प्रकरणी पतीस पाच वर्षांची शिक्षा: धुळे सत्र न्यायालयाचा निकाल

**धुळे, दि. १४ : साक्री पोलीस ठाणे येथे दाखल झालेल्या फिर्यादीमध्ये खटला चालवून आरोपी राजेंद्र उर्फ राजु शिवा सोनवणे वय ४७ वर्ष यास धुळे येथील मे. सत्र न्यायमुर्ती श्रीमती. जे. आर. पुलाटे सो. यांनी पाच वर्षांची शिक्षा सुनावली.**

घटनेची थोडक्यात माहिती अशी की, धुळे शहरातील पेरेजपुर गाव शिवारात आरोपी राजेंद्र उर्फ राजु शिवा सोनवणे याने पैशाचे कारणावरून त्याची मयत पत्नी मीनाबाई राजेंद्र उर्फ राजु सोनवणे हिचेशी वाद घालून दिनांक २५ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास तिचे डोक्यावर कपाळावर, पाठीवर व पोटाबर कुऱ्हाड व कोयत्याने मारून तिची हत्या केली. त्याबाबतीत साक्री पोलीस ठाणे येथे भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे फिर्याद दिली. सदर बाबतीत श्री. भानुदास बी. नऱ्हे पोस.ई. यांनी गुन्हयाचा तपास करुन आरोपी विरोधात आरोपपत्र दाखल केले. सदरच्या खटल्याचे कामकाज में सत्र न्यायमुर्ती श्रीमती. जे. आर. पुलाटे सो. यांच्या न्यायालयात सुरु झाले असता अति. सरकारी अभियोक्ता श्री. अजय शंकरराव सानप, **(पान ४ वर)**

## बेघर निवारा केंद्राच्या प्रस्तावास मनपा स्थायी समितीची मंजुरी

धुळे, दि. १४ : शहरातील एकवीरा देवी मंदिराजवळ असलेल्या बेघर निवारा केंद्राच्या मुदत वाढीच्या प्रस्तावास मंजूरी देताना स्थायी समितीच्या बैठकीत निरनिराळी विकास कामे मंजूर करण्यात आली. नगरोत्थान योजनेंतर्गत शहरात मुलभुत सुविधा आणि विकास कामे करण्याचे विषय मंजूर करण्यात आले. सभापती लता सोनार यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची आज साप्ताहिक बैठक झाली.

महापालिका सभागृहात सभापती लता सोनार यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक झाली. आजच्या सभेतील मुख्य चर्चेचा विषय म्हणजे शहरातील बेघर निवारा केंद्राच्या वाढीव मुदतीचा प्रस्ताव होता. त्यावर चर्चा करून हरिओम बहुउद्देशीय संस्थेच्या मुदतवाढीला मंजुरी देण्यात आली. या सभेत अनेक प्राथमिक समस्या संदर्भात सदस्यांनी प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती केली. शहराच्या सौंदर्यीकरणासाठी आणि सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये शहरातील इलेक्ट्रीक खांबावर नवीन एल.ई.डी. दिवे बसवण्यासाठी मागवण्यात आलेल्या निविदा दर मंजूर करण्यात आले. याशिवाय प्रभाग क्रमांक एक मधील धनदाई नगर आणि वृंदावन कॉलनी येथील खुल्या जागांना संरक्षण भिंत बांधण्याच्या कामाला प्रशासकीय गती देण्याबाबतही सभेत चर्चा होऊन मंजूरी देण्यात आली. शहरातील रस्ते आणि इमारतींच्या कामांचा दोष दायित्व कालावधी आणि साप्ताहिक लेखा तपासणी अहवालही समितीपुढे सादर करण्यात आला **(पान २ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,47,450 रु.+3% GST
सोने- 24 K -1,61,000 रु.+3% GST
चांदी- 2,93,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

जांभुळ ज्युस मिळेल




नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिर्झव्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

## शिंदखेडा न.पंचायत सर्वसाधारण सभा संपन्न: अनेक विषय मंजूर

**शिंदखेडा, दि.१४ (प्रतिनिधी) शिंदखेडा नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा दिनांक १३ मे २०२६ रोजी नगराध्यक्षा श्रीमती कलावती माळी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.** या सभेत विविध कामकाजावर निर्णय घेण्यात आले. सभेत शहराच्या विकासासाठी महत्वाच्या अनेक प्रस्तावांवर विचारविनिमय झाला. सभेत मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये नगरपंचायतीच्या मालकीच्या व्यापारी गाळयांसाठी सुधारीत भाडे प्रणाली राबविणे, घर ते घर घनकचरा संकलनासाठी ठेका पद्धतीने काम करणारे निविदा राबविणे, नगरपंचायती अंतर्गत विविध विभागांमध्ये गरजेनुसार मनुष्यबळ पुरवठा करणे, रस्ते आणि गटार बांधकाम, सोलर लाईट बसविणे, जॉगींग ट्रॅक, व्यायामशाळा वाचविणे, स्मारकाची जागा निश्चित करणे, ओपन स्पेस विकसित करणे, शहरातील सार्वत्रिक शौचालये देखभाल व दुरुस्ती करणे, नगरपंचायतीसाठी लोगो निश्चित करणे, तसेच नगरपंचायतीच्या वाहनांची दुरुस्ती आणि आवश्यक साहित्य खरेदी यांचा समावेश आहे.यावेळी काही विषयांना स्थगिती देण्यात आली.स्थगित ठेवण्यात आलेले प्रस्तावांमध्ये शहरातील नवीन भाजी मंडई शेजारील व्यापारी **(पान ४ वर)**



## आंबाडूकपाडा बनावट मद्य कारखाना प्रकरणातील आरोपी पळाला कसा

**शिरपूर दि.१४ (का.प्र.) : येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाने १३ मे रोजी सकाळी छापा टाकून ताब्यात घेतलेल्या आरोपींपैकी एकाने लघुशंकेच्या बहाण्याने अंधारात पळ काढला. त्याच्याविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र या प्रकरणाबाबत वेगवेगळ्या चर्चांना ऊत आला असून पोलिसांनी सखोल चौकशी करणे गरजेचे झाले आहे.**



तालुक्यातील गधडदेव ग्रामपंचायतीअंतर्गत आंबाडूकपाडा बनावट मद्याचा कारखाना राज्य उत्पादन शुल्क विभागाने उध्वस्त केला होता. या कारवाईत सात लाख ३६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन अजयसिंह उखळदे, मनोहर पिंपळदे, मोगा मुसळदे (तिघे रा.सुलतानपूर ता.शहादा) यांना अटक करण्यात आली होती. त्यांना न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी दिल. रात्री साडेअकराला पुढील चौकशीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी त्यांना हाडाखेड येथील कार्यालयात घेऊन गेले. तेथून त्यांना पळासनेर येथील लॉकअपमध्ये रात्री साडेअकराला घेऊन जात असतांना**(पान ४ वर)**

## लक्झरी बस मालकाकडून लूट सुविधा शुन्य, चौकशी कोण करणार

**शहादा,दि.१४(का.प्र.) - शहादा शहरातून पुणे व मुंबईकडे धावणाऱ्या खासगी लक्झरी बस चालक-मालकांकडून सध्या प्रवाशांची अक्षरशः आर्थिक लूट सुरू असून, प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. हजारो रुपये भाडे आकारूनही या बसमध्ये मूलभूत सुविधा, सुरक्षितता आणि महिला प्रवाशांसाठी आवश्यक व्यवस्था नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.**

महागडे भाडे देऊनही जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः रात्रीच्या प्रवासात महिला प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक लक्झरी बसमध्ये चालकाच्या कॅबिनमध्येच क्षमतेपेक्षा जास्त आणि बेकायदेशीर प्रवासी बसवले जातात. यामुळे बसमधील मार्ग अरुंद होऊन महिलांना चालकापर्यंत पोहोचणे जिकिरीचे ठरते. नैसर्गिक विधीसाठी गाडी थांबवण्याची विनंती करायला गेल्यावर चालक अत्यंत उर्मट भाषेत बोलतात. मागे हॉटेलवर गाडी थांबली होती तेव्हा काय करत होतात? अशा शब्दांत महिलांचा अपमान केला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.संकोचामुळे अनेक महिलांना त्रास सहन करत प्रवास करावा लागत आहे.अनेक खासगी लक्झरी बसेसची अवस्था **(पान २ वर)**

## रखवालदार ते भाजी विक्रेत्याची लेक झाली डॉक्टर ; पेढे वाटून आनंदोत्सव

**सारंगखेडा, दि.१४ (प्रतिनिधी) - गरीबी, हलाखीची परिस्थिती आणि आयुष्यभराचा संघर्ष यावर मात करत रखवालदार ते किरकोळ भाजीपाला विक्रेत्याने मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी खांद्यावर घेत अखेर यशाची नवी कहाणी घडवली आहे.**



शहादा तालुक्यातील भोंगरा या आदिवासी बहुल गावातून प्राथमिक शिक्षण घेऊन कळंबू येथे स्थायी झालेल्या पावरा कुटूंबाचा जीवन प्रवास थक्क करणारा असून इतरांना प्रेरणा देणारा आहे. पावरा कुटुंब २००१ साली कळंबू येथील दादासाहेब गुलाबराव बोरसे शेतकी विद्यालयात मीना चे वडील व आजोबांनी रखवालदारी म्हणून काही वर्षे मजुरी केली. त्यानंतर कळंबू गावात रहिवास करून गेल्या काही वर्षांपासून गुमान पावरा हे हातगाडी वर भाजीपाला विक्रीतून कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवत मुलगी मीना पावराचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करत डॉक्टर पदवी मिळवली. वडिलांच्या संघर्षातुन मीनाने डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले. अन पूर्ण परिवाराचा आनंद गगनात मावेनासा झाला. तिने नुकतेच पाच वर्षे पाच महिन्याचे एम.बी.बी.एसचे शिक्षण कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पूर्ण करून समाजात आदर्श निर्माण केल्याने सर्व स्थरावरून कौतुक होत आहे.

गुमान पावरा हे वडील तेरसिंग पावरा यांना कामात मदत व्हावी म्हणून कळंबू येथील विद्यालयात सहकुटुंब स्थायी झाले. म्हणून मीनाचे इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतचे शिक्षण येथील विद्यालयातच झाले. गरिबीतून डॉक्टर होण्याचे स्वप्न मीनाचे होते मात्र आर्थिक परिस्थिती मुळे शिक्षणाचा भार शक्य नसल्याचे वडिलांनी सांगितले अन मीना चे **(पान ४ वर)**

## छ.संभाजी महाराज जयंती जिल्हा प्रशासनातर्फे विनम्र अभिवादन

**धुळे, दि. १४ - छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी संजय बागडे,संदीप पाटील, तहसिलदार प्रवीण चव्हाणके , नगरपालिका प्रशासन अधिकारी अभिजित बाविस्कर, नायब तहसीलदार मायानंद भामरे, सहायक महसूल अधिकारी विजय बावा यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# आपला महाराष्ट्र

## बचतीचे आवाहन आणि गांधींचा मार्ग

पंतप्रधानांच्या बचतीच्या आवाहनाच्या अनुषंगाने विविध स्तरावर प्रतिक्रिया येत आहेत,त्यात टर उडविणा-याच अधिक दिसतात.याचा अर्थ असा आहे की,जनतेला चंगळवादी विकासाचे गाजर दाखवून अचानक ते गाजर त्यांच्या हातातून काढून घेण्याच्या खटपटीमुळे तो विषय चेष्टेचा झाला आहे. असे असले तरी त्या विषयाचे गांभीर्य मोठे आहे.एक दिवस नक्कीच असा येईल की,सारा विकास परकीय उर्जा संसाधनांच्या भरवशावर असल्याने केव्हातरी राम म्हणावेच लागेल.म्हणूनच आत्मनिर्भर अथवा स्वावलंबी भारताची भाषा वापरावी लागत आहे. स्वावलंबी भारत बघायचा असेल तर सर्वसमावेशक कल्याणाचा मार्ग गांधीजींनी दिलेल्या कार्यक्रमातच आहे.दोनतीन भांडवलदारांच्या कथित स्वदेशी उत्पादनांचा पुरस्कार करण्यात नाही.आपल्या शासनकर्त्यांची पंचाईत अशी आहे की पर्यायी मार्ग गांधीजींचा उपलब्ध असुनही त्यांचे नाव घ्यायचे नाही मात्र आत्मनिर्भरतेचा मंत्र विशिष्ट भांडवलदारांचा अजेंडा चालविण्यासाठी जपायचा अशी मोठी गडबड आहे.खाद्य तेल खाऊ नका म्हणताना शेतकरी उत्पादकांना मातीत घालायचे आणि आयात तेल देशवासियांना खाऊ घालायचे.असा विषमता वादी खटाटोप आपल्या देशात चालू आहे .मात्र समतेचा कार्यक्रम गांधींनी दिला असून त्यास ओलांडून पुढे जाता येणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ समजावी.

रशियायुक्रेन आणि इस्त्रायलगाझा यानंतर आता युद्धाचे केंद्र पश्चिम आशियाकडे सरकत असल्याचे दिसते. संपूर्ण, समृद्ध आणि सजीव देशांना एकामागून एक संपवण्याचा हा प्रकार कच्च्या मालासाठी आणि त्याला तयार करण्यासाठी लागणाऱ्या उर्जेसाठी आणि त्याची विक्री करण्यासाठी बाजारपेठेतील स्पर्धेमुळे होत आहे. व्हेनेझुएला, क्युबा, कोलंबिया यांसारख्या उदाहरणातून ही बाब स्पष्ट होते. अशा परिस्थितीत महात्मा गांधींनी काय सांगितले असते किंवा काय केले असते याबाबत चर्चा करता येण्यासारखी आहे. पेट्रोल पंपांवर पेट्रोल मिळत नाही, त्यामुळे आता पुन्हा पदयात्रेचे दिवस येताना दिसत आहेत असे अनेक जण सोशल मीडियावर लिहिताना बोलताना दिसतात.रोजगाराचे संकट मोठे असल्याने ग्रामोद्योग किंवा वस्त्र स्वावलंबना सारखे उद्योग पुन्हा सुरू होऊ शकतात कारण त्यास उर्जा लागत नाही,आपल्याकडे ऐंशी टक्के कच्चे तेल आयात होऊन त्यावर प्रक्रिया होते.त्यावर म्हणजे दुसऱ्यांच्या भरवशावर आपला विकास चालू आहे.ही प्रक्रिया या ना त्या कारणांमुळे खंडित होऊ शकते.तेव्हा सगळाच खेळ खलास होईल.आणि उर्जेचा वापर नसेल अशा रोजगारांचा पुन्हा उदय होईल.म्हणजेच पुनश्च गांधीजींच्या तत्त्वज्ञानाकडे जावे लागेल अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.वरकरणी हे मृगजळा प्रमाणे वाटेल मात्र हा विचार बळावू शकतो. गांधीजींचा जन्म १८६९ मध्ये झाला. १८९१ मध्ये ते वकिलीचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले आणि १८९३ मध्ये नोकरीसाठी दक्षिण आफ्रिकेला पोहोचले. याच काळात जगात वसाहतवाद वेगाने वाढत होता.इंग्लंडसह फ्रान्स, जर्मनी, रशिया, पोर्तुगाल आणि इतर अनेक युरोपीय देश आपापल्या वसाहतींच्या शोधात होते.औद्योगिक क्रांतीनंतर सुमारे पंच्याहत्तर वर्षांनी सत्ताधारी देशांना हे स्पष्ट पणे कळले होते की, विकासाचे हे मॉडेल टिकवून ठेवण्यासाठी प्रचंड प्रमाणात इंधन आणि कच्च्या मालाची गरज भासेल, ते कुठल्यातरी एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणे शक्य होणार नाही. त्यामुळे जगातील कृषिप्रधान जनतेवर नियंत्रण मिळवणे आवश्यक ठरले आणि बाकीचे मुद्दे दुय्यम ठरले सर्वात आधी कृषी क्षेत्रावर नितंत्रण मिळविणे आवश्यक वाटू लागले. वसाहतवादी मानसिकतेच्या विस्ताराची ही स्पर्धा तेव्हा सुरू झाली आणि आजही ती विविध पध्दतीनेक्ष सुरू आहे.आपले राज्यकर्ते गुलामीच्या मानसिकतेच्या विरोधात बोलत असले तरी त्यांची विचारधारा वसाहतवादीच आहे हे केव्हाच लक्षात आलेले आहे.विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच पहिल्या महायुद्धाची पार्श्वभूमी तयार होऊ लागली होती. जगभरातील शस्त्रास्त्रांची स्पर्धा, आणि सर्वत्र संघर्षाचे वातावरण होते. या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धाला तोंड फुटले होते.

एका बाजूला हे सर्व घडत असताना दुसऱ्या बाजूला बॅरिस्टर झालेले मोहनदास करमचंद गांधी यांचा महात्मा होण्याचा प्रवास सुरू झालेला होता. पुढे दोन महायुद्धे झाली; जगाने अणुबॉम्बचा विध्वंस पाहिला. त्याच वेळी जगाने गांधीजींचे सत्याचे प्रयोग आणि भारताच्या स्वातंत्र्याची ऐतिहासिक आणि अनोखी लढाई देखील अनुभवली.

गांधीजींची अहिंसा ही केवळ भारताच्या प्राचीन आध्यात्मिक परंपरेतून आलेली संकल्पना नव्हती तर ती युद्ध, संघर्ष आणि मानवी वेदनांच्या अनुभवातून घडलेली होती. भगवतगीतेचा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव होता.त्या प्रभावामुळे त्यातील संदेश ते जनतेला देतात.डोळ्याच्या बदल्यात डोळा हा सिद्धांत अखेर संपूर्ण जगाला आंधळे बनवेल.असा त्यांचा संदेश होता.तो केव्हाच सिध्द झालेला आहे.इतिहास हा केवळ विजयपराजय आणि विनाशाचा दस्तऐवज नसून तो कोणाच्या महत्त्वाकांक्षांची कथा देखील नाही. इतिहास ही एक अशी पाठशाळा आहे जिथे आपण आपल्या चुका ओळखून त्यातून शिकू शकतो असे विश्लेषण अनेकांनी केलेले आहे.सध्याच्या परिस्थितीचा विचार करू जाता आपल्या असे लक्षात येईल की,जगाची वाटचाल तिसऱ्या महायुद्धाकडे होत आहे. त्याची चाहूल अधिक स्पष्टपणे ऐकू येऊ लागली आहे. जगातील शक्तिशाली राजकारण आणि त्यातील स्पर्धेमुळे परिस्थिती अधिक धोकादायक होत चालली आहे. अशा वेळी गांधीजींच्या विचारांकडे वळून पाहिले तर त्याचे

त्यांच्या हिंद स्वराज या पुस्तकात या परिस्थितीचे उत्तर सापडते. एखाद्या शस्त्रधारी माणसाने तुमची संपत्ती चोरली, त्यामुळे तुम्हाला राग आलेला आहे,तुम्ही चिंतीत आहात.त्यामुळे संबंधितास शिक्षा व्हावी यासाठी तुम्ही प्रयतक करता आहात. तुम्ही त्याच्यावर हल्ला करण्याची समजा योजना आखून काही लोक गोळा केले पण तो पळून जातो आणि स्वतःचे साथीदार गोळा करून तुम्हालाच आव्हान देतो. त्यानंतर संघर्ष वाढत जातो, दोन्ही बाजूंनी लोक जमा होतात, आणि शेवटी त्या संघर्षामुळे संपूर्ण समाज अस्थिर होतो.असे उदाहरण गांधीजींनी हिंद स्वराज्य मध्ये दिलेले आहे!

गांधीजी सांगतात की बदला घेण्याच्या वृत्तीमुळे आपण स्वतःचीच शांतता नष्ट करून बसतो. भीती, असुरक्षितता आणि सततच्या संघर्षाच्या वातावरणात समाज अडकून पडतो.

गांधीजी हे विचार १९०९ मध्ये हिंद स्वराज्य या पुस्तकातून लिहित होते, हे अगदी आजच्या काळाचे भाष्य वाटेल. म्हणूनच नव्या पिढीने गांधीजींना पुन्हा पुन्हा वाचणे आवश्यक झाले आहे.नव्या पिढीचे दुर्दैवाने तिकडे लक्ष नाही.ती भरकटत चालली असून अशा भरकटलेल्या पिढीच्या हातात देश सोपविला तर देशाचे काय होईल ते सांगण्यासाठी कुठल्याही ज्योतिषाची गरज नाही.स्वराज आणि स्वदेशीची व्याख्या करताना गांधीजी म्हणतात की, शोषणमुक्त अर्थव्यवस्था ही विकेंद्रीत असली पाहिजे. जिथे उत्पादन होते तिथेच त्याचा वापर व्हायला हवा. अन्यथा अतिरिक्त उत्पादन विकण्यासाठी बाजारपेठ शोधताना दुसऱ्या समाजांना गुलाम बनवण्याची वेळ येते.भारतासारख्या देशात लोकसंख्या इतकी मोठी आहे की जर देशात एकता आणि शांतता टिकून राहिली तर बाहेरील बाजारपेठांवर अवलंबून राहण्याची गरजच पडणार नाही. जे लोक यापेक्षा वेगळ्या आर्थिक व्यवस्थेचा पुरस्कार करतात, त्यांच्या हेतूंमध्ये किंवा विचारांमध्ये काहीतरी गंभीर दोष आहे.भांडवलशाहीने विकासाच्या नावाखाली एक चमकदार जग उभे केले, पण त्या चमकदार आवरणामागे पर्यावरणाचा विध्वंस, नैसर्गिक संसाधनांवर कब्जा आणि सामान्य लोकांची फसवणूक दडलेली आहे. गांधीजी केवळ या स्थितीचा पर्दाफाश करत नाहीत, तर न्याय्य, संतुलित आणि मानवी समाजव्यवस्थेचा पर्याय देखील सुचवतात. परंतु काही तथाकथित विचारवंत गांधींना आऊट डेटेड मानतात कारण त्यांच्या विकासाची संकल्पना विषमतेशी निगडित असून एक क्रिम वर्ग निर्माण करण्याची आहे.भारत गांधी और मैं या पुस्तकात आचार्य रजनिश यांनी गांधी तत्वज्ञानाची भयंकर टर उडविलेली आहे.जब कही उतरनाही नहीं है तो रेलमे बैठना क्यू और बैठना है तो उतरना क्यू असे गांधीजींचे तत्त्वज्ञान असल्याचे ते सांगतात अर्थात त्यांच्या विश्लेषणातून काहीच अर्थ निघत नाही ही वस्तुस्थिती आहे.बैलगाडीत बसून बैलगाडीसह विमानातून प्रवास करणे म्हणजे बैलगाडीने प्रवास करणे असेही उपरोधिक पणे आचार्य म्हणतात,त्याच प्रमाणे काही विचारवंत म्हणतात की,आता बैल गाडीने प्रवास करावा काय ? या प्रश्नावर उत्तर होय असेच आहे.अगदीच बैलगाडीने प्रवास केला पाहिजे असे काही नाही.सायकल आहे. इलेक्ट्रीकच्या दुचाकी आहेत.पण त्यांनाही उर्जा लागते.म्हणजेज ज्या टप्प्यावर आपण विकासाची गाडी पोहचवली तेथून परतीचा मार्ग खुंटतो.शेवटी माणूस हतबल होऊन संपतो तशी परिस्थिती येऊ पाहत आहे.म्हणूनच गंगाजळी खर्च करून अमाप वेग चालू ठेवण्यासाठी देशातील परकीय चलन संपुष्टात येत असेल तर तुम्हाला पर्यायांचा विचार करावाच लागेल.त्यासाठी गांधी विचार हाच पर्याय शिल्लक राहतो.लुटीच्या अर्थकारणातून आपण बाहेर पडलो नाही तर गच्छंती अटळ आहे.

गांधीजींच्या मृत्यूला अजून शंभर वर्षे पूर्ण झालेली नाहीत , जग त्यांच्या विरोधात सांगितलेल्या मार्गावरच चालले आहे. या मार्गावर चालताना आपले बैल नष्ट झाले, बैलगाड्या संग्रहालयात गेल्या; आणि बदल्यात आपल्याला प्रदूषित पर्यावरण मिळाले,संसाधनांसाठी सतत चालणारी युद्धे, सुरू झाली आणि माणसाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारी तंत्रज्ञानाची स्पर्धाही सुरू झाली.त्या स्पर्धेत आपण उभे आहोत पण परावलंबी आहोत कारण उर्जेची सगळी साधन सामुग्री आपल्याला बाहेरून आणावी लागते.त्या भरवशावर देश त्या स्पर्धेत कितपत टिकून राहील हा प्रश्न आहे. ते एक महाभारत असून या नव्या महाभारतातून मानवजातीचा बचाव कसा होईल या प्रश्नाचे उत्तर शोधायचे असेल तर पर्याय शोधावा लागेल. आणि त्या पर्यायाचे नाव आहे महात्मा गांधी.



## अजंग-मुकटीला दोन नवे ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित
### मनोहर भदाणे यांच्या हस्ते लोकार्पण

**धुळे, दि.१३ - धुळे ग्रामीणमधील अजंग व मुकटी शिवारातील शेतकरी व ग्रामस्थांची अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली वीज समस्या निकाली निघण्यास मोठी मदत झाली आहे. आमदार राम भदाणे यांच्या पाठपुराव्यातून शंभर केव्हीएचे दोन नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर होवून बसविण्यात आलेत. त्यांचे जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.**

याप्रसंगी महावितरणचे कनिष्ठ अभियंता गगन कुरेकर, दिनेश माळी, अरविंद रणदिवे, महेश माळी, रवींद्र भदाणे, सुभाष अहिरे, पारस पाटील, मुन्ना पाटील, भूषण पाटील, किशोर पाटील, सुशील भदाणे, किरण पाटील, दिलीप पाटील, वाल्मिक पाटील, वासुदेव पाटील, नंदकिशोर पाटील, काळखेडेचे उपसरपंच ज्ञानेश्वर पाटील, राजेंद्र शर्मा, राजू यादव, दिनेश गर्दे, अरविंद पाटील, किरण रघुनाथ पाटील व परिसरातील ग्रामस्थ, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगावबारी जलकुंभाच्या ठिकाणी मोठी पाण्याची गळती
### महापौर परदेशींनी अधिकाऱ्यांना सुनावले खडेबोल

**धुळे, दि. १३ (प्रतिनिधी) : शहरातील प्रभाग क्रमांक एक मधील नागावबारी परिसरात अनेक महिन्यांपासून होत असलेल्या पाणी गळतीबाबत महापौर मायादेवी परदेशी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रत्यक्ष पहाणी करीत त्यांनी पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी खडेबोल सुनावले. युध्दपातळीवर गळती रोखा आणि दर्जेदार काम करा, अशी सुचना केली. गळती रोखली जाणार असल्याने पाणी समस्येबरोबरच रस्त्यावरील खड्यांची समस्या देखील दूर होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.**



तापी पाणी पुरवठा योजनेचा जलकुंभ नगावबारी जवळील टेकडीवर आहे. पण, या ठिकाणी असलेल्या जलवाहिनीस अनेक महिन्यांपासून गळती आहे. त्यामुळे दररोज लाखो लिटर पाणी वाया जात होते. पाणी गळतीमुळे परिसरातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली होती. रस्त्यांवर चिखल, खड्डे आणि वाहतुकीस अडथळे निर्माण होत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. भर उन्हाळ्यात एका बाजूला नागरिकांना पाण्याची टंचाई जाणवत असताना दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या गंभीर प्रश्नाची दखल घेत महापौर मायादेवी परदेशी यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देत पाहणी केली. यावेळी महादेव परदेशी, नगरसेवक ललित माळी, नगरसेविका योगिता कुटे, सुभाष जगताप मतसेच पाणीपुरवठा अधिकारी नवनीत सोनवणे उपस्थित होते. पाहणी दरम्यान नागरिकांनी संताप व्यक्त करत वारंवार तक्रारी करूनही उपाययोजना होत नसल्याचे सांगितले. महापौर मायादेवी परदेशी यांनी संबंधित विभागाला तात्काळ दुरुस्तीचे आदेश देत कामात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. स्थानिक नागरिकांनी महापौरांसह लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्षात येऊन समस्या समजून घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## तळोदा तालुक्यात पारा वाढल्यामुळे रस्ते निर्मन्युष्य: वृक्ष तोडीचा परिणाम

**तळोदा, दि.१३ (प्रतिनिधी) - शहरासह ग्रामीण भागातही सर्वत्र तापमानाचा पारा चढला आहे. वाढत्या उष्णतेमुळे रस्ते निर्मनुष्य झाले असून याचे मुख्य कारण सातपुड्यात प्रचंड प्रमाणावर झालेली वृक्षतोड, पूर्वी तळोदा शहरात आजूबाजूच्या परिसरात मोठमोठे डेरेदार वृक्ष असल्याने तापमानाचा पारा कमी राहत असे व प्रवाशांना सावलीही देत होते. परंतु शहराच्या विकास कामासाठी हातोदरोड, शाहादा रोड, चिनोदरोड, व शहरातील मोठमोठी वृक्ष काढण्यात आली होती. त्याजागी रस्त्याचा कडेला नविन झाडे लावण्यात आली नाहीत व शहरात झालेले मोठ्या प्रमाणावर कॉंक्रीटीकरण त्यामुळे जमिनीची धूप वाढली आहे.**



शहरात कधी नव्हे इतके तापमान , अंश सेल्सिअस पेक्षाही जास्त वाढत असल्याने चटका देणारे ऊन आणि असह्य उकाड्याने नागरिक हैराण झाले आहे. सदर या उष्णतेच्या संपर्कामुळे हिट स्ट्रेस निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्वांनी याबत आपली काळजी घेणे आवश्यक आहे. तळोदा शहरासह ग्रामीण भागातही मे महिन्यात उन्हाची तीव्रता चांगलीच वाढली आहे.

दुपारच्या वेळी उष्ण वारे देखील वाहत असल्याने जनजीवनावर परिणाम झाला असून दुपारच्या लग्न समारंभाना जाणे नागरिक टाळू लागले आहेत. तर शहरातील उन्हामुळे दुपारी दहा वाजेपासून ते दुपारी चार वाजेपर्यंत मेनरोडचे प्रमुख रस्ते ओस पडले दिसून येता आहेत. शहरातील बाजारपेठेत देखील त्याचा परिणाम होत असून सर्वत्र शुकशुकाट दिसत आहे. वाढत्या तापमानापासून सुरक्षित राहण्यासाठी पंखे, कुलर, ए. सी. चा वापर शहरातील नागरिक करीत आहे.

लहान मुले, महिला, जेष्ठ नागरिक यांनीही भर उन्हात जाणे टाळले असून त्यांना भर उन्हात जाण्यास मजजाव करण्यात येत आहे. तळोदा शहरातील बाजारपेठेत दुपारी बारा ते चार वाजेपर्यंत शुकशुकाट असल्याचे चित्र दिसत असून व्यापारावर परिणाम होऊन सदरचा उन्हामुळे खरेदी-विक्रीवर परिणाम होत असल्याचे व्यापारी वर्गाकडून बोलले जात आहे. तर बचावासाठी घराबाहेर पडण्यापूर्वी भरपूर पाणी पिणे, सुती, सैल आणि आरामदायी कपडे घालणे, भरपूर अन्न खाल्ल्यावरच घरातून बाहेर पडणे, उन्हात बाहेर जाताना डोके झाकणे, छत्रीचा वापर करणे, वारंवार पाणी-ताक पिणे, ओ. आर.एस. पाण्याचे द्रावण किंवा लिंबूपाणी, आंबा पन्हे आदी घरगुती पेय पिण्यास प्राधान्य देणे गरजेचे आहे.

## भरधाव पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

नंदुरबार, दि.१३ - शहादा तालुक्यातील कवळीथ परिसरात भरधाव पिकअपने दुचाकीला धडक दिल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. याप्रकरणी मोटार अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रावण हंबर पाटील (वय४८, रा. कवळीथ ता. शहादा जि. नंदुरबार) हे दुचाकीवरून जात असताना आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एमएच ३९ एडी २४४१हे भरधाव व निष्काळजीपणे चालवत त्यांच्या मोटारसायकलीला समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात रावण पाटील यांच्या पायाला, डोक्याला व पोटाला गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तसेच मोटारसायकलीचेही नुकसान झाले आहे. या प्रकरणी संबंधित वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## सोनगीर पोलीसांनी दोन गोवंक्ष केले जप्त

सोनगीर दि.१२(प्रतिनिधी)- सोनगीर फाट्याजवळ पिकअप वाहनातून कत्तलीच्या उद्देशाने नेली जाणारी दोन गोवंश जनावरे सोनगीर पोलिसांनी जप्त केली आहेत. याप्रकरणी मालेगाव येथील दोन संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण दोन लाख चौदा हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सोमवार, दि. ११ मे रोजी दुपारी साडेपाच वाजेच्या सुमारास सोनगीर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे यांना गुप्त माहिती मिळाली की, सोनगीर फाट्या जवळ एक पिकअप गाडी ( १२ ४३१५) अपघातग्रस्त स्थितीत उभी असून, त्यात जनावरे आहेत. या माहितीच्या आधारे पीएसआय रवींद्र बागुल, पो. कॉ. जगदीश अहिरे व अन्य कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेवून तपासणी केली असता, रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या महिंद्रा पिकअपमध्ये दोन बैल अत्यंत निर्दयपणे कोंडलेले आढळले. पोलिसांनी जनावरांसह दोन लाख रुपयांची पिकअप गाडी असा एकूण २,१४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.याप्रकरणी रिहान युसूफ कुरेशी व मोहम्मद जाहीद नदीम अख्तर दोन्ही रा. देवीमल्ला, दानिश पार्क, मालेगाव (जि. नाशिक) या दोघांविरुद्ध सोनगीर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरुन

### लक्झरी बस मालकाकडून लूट

अत्यंत दयनीय झाली आहे. खिडक्यांच्या काचा, मधले सीट खिळखिळे झाले असून, लाईट आणि चार्जिंग पॉईंट अनेकदा बंद असतात. एसी बसचे तीन ते चार पट भाडे वसूल करूनही थंडावा मिळत नाही. काही बसमधील क्लिनर तर मद्यप्राशन करून प्रवाशांशी हुज्जत घालत असल्याचेही समोर आले आहे. या तक्रारी मालकांकडे केल्यास ते फोन उचलत नाहीत किंवा उलट प्रवाशांनाच दमदाटी करतात.प्रवाशांनी असा खळबळजनक आरोप केला आहे की,आरटीओ आमचे काहीही करू शकत नाही, अशी भाषा बस चालक वापरतात. शहादा ते पुणे-मुंबई मार्गावर धावणाऱ्या एकाही बसची प्रादेशिक परिवहन विभागाकडून रस्त्यात तपासणी केली जात नाही. वाहनांचे फिटनेस, अग्निशामक यंत्रणा, सीसीटीव्ही, जीपीएस आणि विम्याची तपासणी का केली जात नाही? आरटीओमधील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या वरदहस्तामुळेच हे प्रकार सुरू असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे.या सर्व प्रकारामुळे प्रवाशांमध्ये तीव्र संताप आहे.प्रादेशिक परिवहन विभाग, जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून या भंगार बसेसची तपासणी करावी,वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत आणि प्रवाशांची आर्थिक लूट थांबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.आरटीओ विभागाने प्रत्येक गाडीचे चालक व क्लिनर यांची रस्त्यात थांबवून तपासणी केल्यास मोठे गैरप्रकार उघड होतील, असेही नागरिकांचे म्हणणे आहे.

### बेघर निवारा केंद्राच्या प्रस्तावास मंजुरी

आणि त्यावर चर्चा झाली. सदस्य अमीर पठाण यांनी सुलतानिया चौक फिडर संदर्भात प्रश्न उपस्थित करून हा प्रश्न कधी सोडविणार, अशी विचारणा केली. सदस्या वंदना भामरे यांच्यासह अमोल मासुळे आणि इतर सदस्यांनी विविध प्रभागांमधील स्वच्छते संदर्भात तसेच पाणी प्रश्नासंदर्भात प्रशासनाने योग्य नियोजन करावे. नागरिकांसाठी स्वच्छता तसेच पाण्यासंदर्भात योग्य ते उपाय योजावेत, असे सांगितले. यावेळी महानगरपालिकेचे सर्व अभियंता, उपायुक्त करुणा डहाळे, नगरसचिव मनोज वाघ उपस्थित होते.

### शब्दकोडे क्रमांक : २३६४

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | | ■ | ६ | ७ | |
| ८ | | ■ | ९ | | ■ | | ■ | १० | | | ■ |
| | ■ | ११ | | ■ | १२ | | | | | ■ | १३ |
| ■ | १४ | | | १५ | ■ | | ■ | | ■ | १६ | |
| १७ | | | ■ | १८ | | ■ | १९ | | २० | ■ | |
| २१ | | ■ | २२ | | ■ | २३ | ■ | २४ | | २५ | |
| | ■ | २६ | | ■ | २७ | | २८ | ■ | २९ | | ■ |
| ■ | ३० | ■ | ३१ | ३२ | | ■ | ३३ | | ■ | ३४ | ३५ |
| ३६ | | ३७ | ■ | | ■ | ३८ | | ■ | ३९ | ■ | |
| | ■ | ४० | | | ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | |
| ■ | ४४ | | ■ | ४५ | | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ |
| ४९ | ■ | ५० | | ■ | ५१ | | | ■ | ५२ | | |

**आडवे शब्द :** १. परतफेड ४. इंग्रजीतील-जोक ६. जाडसर ८. वाळू ९. एक पाचक पेय १०. कर्म ११. करार १२. महात्मा गांधींच्या वास्तव्याने पावन झालेले गुजरातमधील एक आश्रम १४. तळहात १६. करम १७. धैर्य १८. भेट १९. इंग्रजीत-नाही २१. आशीर्वाद २२. शपथ २५. नूतन वा आश्चर्य २७. एक नशा आणणारे पेय २८. नारळापासून मिळते ३०. ठिकाण ३२. आखाती देशातील चलन ३४. वारसा ३५. उतार-विरुद्ध ३७. वाहन चालवणारा ३९. सागरात मिळणारा मौल्यवान दागिना ४०. होकार नाही-विरुद्ध ४१. ऐट ४२. कलिका ४४. गुजरातीत-दोन ही संख्या ४५. दर ४६. परमेश्वर ४७. बकरा ५०. एक मराठी नाटक 'ती फुलराणी' ५१. मग्न ५२. एक वाद्य ५३. हवेतील थंडावा **उभे शब्द :** १. पोलिसांची कवायत २. मदनाची स्त्री ३. दैना ५. एक महिना ६. ओहोटी-विरुद्ध ७. एक इंग्रजी मद्य १०. हिंदीत-कंबर ११. दया-हिंदीत १३. आंब्याची बाग १४. अतिरेक १५. आमिर खानचा एक सिनेमा १७. भगवंताचा वर्ण २०. पतीची दुसरी पत्नी २२. महाराष्ट्रातील एक स्थानिक जमात २४. मुद्दा २६. हाव २८.सखल-विरुद्ध २९. एक नक्षत्र ३१. भिंतीवर राहणारा एक जीव ३३. बर्फाळ प्रदेशात आढळणारा एक केसाळ प्राणी ३६. मेघ ३७. चतुर्थ, एक संख्या ३८. लग्नात करा घेऊन मिरवणारी ३९. लाकडाची बांधलेली मोट ४२. कावड ४३. श्वास घेण्याचे इंद्रिय ४७. लाकडाची लेखणी ४८. तबल्याचा साथीदार ४९. वारा

#### शब्दकोडे क्रमांक : २३६३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | ज | ग | ड | ■ | को | ठा | र | ■ | दै | नि | क |
| म | हा | ल | ■ | सा | य | ■ | वा | स | ना | ■ | वा |
| ■ | ल | ■ | पा | व | ■ | म | न | वा | ■ | जा | ड |
| घो | ■ | स | ■ | धा | क | ■ | गी | ■ | वा | म | ■ |
| ■ | अ | न | ब | न | ■ | ख | ■ | बी | ■ | न | ड |
| बो | ट | ■ | ल | ■ | बे | डू | क | ■ | ख | ग | ■ |
| ग | ■ | ह | वा | ला | ■ | स | म | र | ■ | र | ज |
| दा | व | ■ | न | व | खा | ■ | त | स | दी | ■ | वा |
| ■ | ल | हू | ■ | णी | ■ | श | र | द | ■ | मी | न |
| हो | य | ■ | नी | ■ | वी | र | ता | ■ | सं | त | ■ |
| का | ■ | मी | ■ | सं | ग | म | ■ | स | सा | ■ | खु |
| र | त | ■ | अं | ग | ■ | न | ट | ■ | र | सा | ळ |

## पिकअपची बाईकला धडक, एक जखमी

शिरपूर, दि.१३ (का.प्र.) - भरधाव पिकअपने इलेक्ट्रिक बाईकला धडक देऊन झालेल्या अपघातात एकजण जखमी झाला. हा अपघात ११ एप्रिलला रात्री सव्वाआठला अर्थे ते शिरपूर रस्त्यावर घडला होता. डॉ. दिनेश सुभाष पाटील (वय ४७ वर्ष, रा.अर्थे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, भरधाव पिकअपने त्यांच्या इलेक्ट्रिक बाईकला धडक दिली. अपघातानंतर पिकअपचालक वाहनासह पळून गेला. शहर पोलिसांनी पिकअपचालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून हवालदार प्रेमसिंह गिरासे तपास करीत आहेत.





प्रकाश में आज – लगाम




अमिरखान, ग्रेसि सिंग, रेचलशेलि, यशपाल शर्मा, रघुबीर यादव

## पान १ वरुन

### छ. संभाजी महाराज जयंती उत्सव उत्साहात संपन्न

प्रथम महापौर भगवानजी करनकाळ तसेच रणजीतराजे भोसले यांच्या उपस्थितीत पार पडले. छावा फलकाचे उद्घाटन महापौर मायादेवी परदेशी, प्रतिभा चौधरी, कल्पना महाले, जयश्री अहिरराव, भाजप गटनेत्या किरणताई राकेश फुलेवार, सारिका प्रविण अग्रवाल, प्रभादेवी परदेशी, पुष्पा राजेश पवार, योगिता संजय कुटे व हेमाताई हेमाडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे होते. यावेळी डॉ. विक्रांत मोरे, किशोर पव्हाण व संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत सोनार उपस्थित होते. रक्तदान शिबिराचे उद्घाटन संजय शर्मा, मनोज मोरे, गोरखशेठ पाटील, सतीष महाले व राजू पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. दीपप्रज्वलन स्थायी समिती सभापती लताबाई पोतदार, जोलाना पाटील, सुरेखा उगले, शुभांगीताई पाटील व डॉ. निशा महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

पुतळा निर्माण कार्यासाठी योगदान देणाऱ्यांचा गौरव

छत्रपती संभाजी राजे पूर्णाकृती पुतळा निर्माण कार्यासाठी योगदान देणाऱ्या अनेक मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. सुभाष भामरे, राजवर्धन कदमबांडे, रोहिदास जगताप, चेतन मंडोरे, सुभाष देवरे, भरत मराठे, किरण पाटील, चंद्रकांत रघुवंशी, विनायक शिंदे, अनुप अग्रवाल, डॉ. कमलताई मराठे, माजी आमदार कुणाल रोहिदास पाटील, शितलकुमार नवले, गुरजितसिंह ग्यानी, मिनाबाई देशमुख, टी. पी. शिंदे, राजू मराठे, कुणाल पवार, योगिराज मराठे, ॲड. राधिका जाधव, ॲड. अभिजीत पाटील, सेवा संघ अध्यक्ष संदीप पाटील, चंद्रकांत ओगले, डॉ. अनिल पाटील, हरीभाऊ पवनकर, प्रकाश चौधरी, सुधाकर बेंद्रे व राजेंद्र काळे आदींचा समावेश होता.

पदाधिकाऱ्यांचे परिश्रम

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी छत्रपती संभाजी राजे पूर्णाकृती पुतळा निर्माण समितीचे अध्यक्ष नानासाहेब कदम, उपाध्यक्ष देवेंद्र सोनार, राजेश पवार, ॲड. नितीन पाटील, ॲड. नामदेव साठे, मनोज पवार, अब्दुल काजी, अर्जुन पाटील, प्रदीप जाधव, ॲड. दिनेश काळे, अकबर शेख आदींनी विशेष परिश्रम घेतले. तसेच छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती चे अध्यक्ष कल्पेश शर्मा, कार्याध्यक्ष बाळासाहेब गव्हाणे, उपाध्यक्ष योगेश विभुते यांच्यासह गिरीष सोनी, दिनेश आटोळे, मनोज गोरे, योगेश देशमुख, विजय गवाळे, रविंद्र शर्मा, आरिफ पठाण, भैय्या चौधरी, सुनिल पाटील आदी पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला.

### जिल्हा पोलिस दलातर्फे तक्रार निवारण दिन

सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाद्वारे नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करून त्यांना योग्य कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पोलिस दलाकडून करण्यात आले आहे.

### धुळे शहरातील विजेचा खेळखंडोबा वाढल्याने संताप

शहरातील विविध भागांमध्ये विशेषतः देवपूरमध्ये काही दिवसांपासून वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे शहरातील नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. यंदा तापमानाचा पारा ४५- ४६ अंशांपर्यंत पोहोचल्याने सारेच उकाड्याने हैराण झाले आहेत. यातच रात्री-अपरात्री सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याने आबालवृद्धांना उकाड्यासह विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. यातून जनभावना तीव्र होत आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी आज वीज महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र महाजन, अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय नागठाणे यांची बैठक घेत विविध निर्देश दिले.

अतिरिक्त रोहित्रे त्वरित बसवा

यामध्ये देवपूरसह साक्री रोड, मिल परिसरासह शहरातील विविध भागांत वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा त्वरित नियमित करावा. त्यासाठी ठिकठिकाणी अतिरिक्त रोहित्रे उभारून वीज भाराची विभागणी करावी, जुन्या वीज उपकेंद्रांमधील पॉवर ट्रान्स्फार्मरची क्षमता वाढवावी, शहरातील अन्य भागांमध्ये नवीन वाढीव क्षमतेचे पॉवर ट्रान्स्फार्मर बसवावेत, नवीन वीज उपकेंद्रांची उभारणी करावी, त्यासाठी जागा उपलब्धतेबाबत महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करावी, वाढते तापमान व आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नियमित देखभाल-दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत, कुठल्याही परिस्थितीत नागरिकांना नियमित व सुरळीत वीजपुरवठा करावा, त्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देशही आमदार अग्रवाल यांनी दिले. आमदार अग्रवाल यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या बैठकीला भरत अग्रवाल, नगरसेवक अमोल मासुळे, प्रवीण अग्रवाल, विकी परदेशी, दिनेश पोतदार आदी उपस्थित होते.

अतिरिक्त रोहित्रांची ऊर्जा राज्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी

दरम्यान, आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी दोन दिवसांपूर्वीच राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेत धुळे शहरातील खंडित वीजपुरवठ्यासह विविध प्रश्नांवर निवेदन देत चर्चा केली. यावेळी आमदार अग्रवाल यांनी मंत्री बोर्डीकर यांच्याकडे शहराला अखंडित व सुरळीत वीजपुरवठा होण्यासाठी १०० केव्ही व २०० केव्हीच्या अतिरिक्त रोहित्रे उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली. तसेच इनकमिंग फीडर ट्रीप होणार नाहीत, यासाठी शहरातील विविध भागांमध्ये पाच एमव्ही क्षमतेच्या रोहित्रांच्या ठिकाणी १० एमव्ही क्षमतेचे रोहित्र उपलब्ध करून देण्याचीही विनंती केली. यावर मंत्री बोर्डीकर यांनी वीज कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांना आमदार अग्रवाल यांच्या मागणीनुसार त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

### डाबली-धांदरणे पाण्याअभावी तहानले

करावे लागत असून, विहिरीत उतरून पाणी भरताना अपघाताची भीती निर्माण झाली आहे. काही महिलांनी संतप्त होत म्हणाले, अधिकारी एसीमध्ये बसून फक्त पगार घेतात; आमच्या हालअपेष्टा कोण समजून घेणार?

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. यामध्ये गावासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविणे, नव्या विहिरी व बोअरवेल मंजूर करणे, तसेच पाणीप्रश्न सोडविण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्याचा समावेश आहे.प्रशासन गावांची पाहणी करून तातडीचा अहवाल तयार करेल आणि दीर्घकालीन उपाययोजना लवकर राबवेल अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

### व्हीडी सतीशन होणार केरळचे नवे मुख्यमंत्री

राहुल गांधींची पहिली पसंती असल्याचे वृत्त होते. राहुल गांधींनी ११ मे रोजी दिल्लीत वेणुगोपाल यांची खासगी भेटही घेतली होती.

कोट्टायमचे आमदार राधाकृष्णन यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, हायकमांडने सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतले आणि राहुल गांधी संपूर्ण प्रक्रियेत थेट सहभागी होते. ते म्हणाले की, निवडणुकीसाठी लोकशाही प्रक्रियेचे पालन करण्यात आले. जेव्हा इतके उमेदवार समोर येतात, तेव्हा नेत्याच्या निवडीबाबत गोंधळ निर्माण होणे स्वाभाविक आहे. यूडीएफने केरळमधील १०४ पैकी १०२ जागा जिंकल्या, तर काँग्रेसने यापैकी ६३ जागा जिंकल्या. वृत्तानुसार, काँग्रेस आमदारांच्या एका बैठकीत ७५-८० टक्के काँग्रेस आमदारांनी के. सी. वेणुगोपाल यांना पाठिंबा दिला. व्ही. डी. सतीशन यांना केवळ ६ आमदारांचा पाठिंबा मिळाला. मात्र, बैठकीनंतर तीन माजी प्रदेशाध्यक्षांनी सतीशन यांच्या नावाला पाठिंबा दिला. इतकेच नाही, तर यूडीएफचे मित्रपक्ष आययूएमएल आणि केरळम काँग्रेस (जोसेफ) यांनीही सतीशन यांना उघडपणे पाठिंबा दिला. सतीशन यांना वेणुगोपाल यांच्या तुलनेत मोठा जनाधार आहे. ते मावळत्या विधानसभेत विरोधी पक्षनेते सुद्धा होते.

## पान १ वरुन

### नीट पेपरफुटीप्रश्नी सीबीआयची देशभरात कारवाई

विकत घेतली होती. त्यानंतर शुभमने करिअर कौन्सिलिंगच्या नावाखाली टेलिग्राम ग्रुपचा वापर करून ही प्रश्नपत्रिका हरियाणातील मध्यस्थांना पंधरा लाख रुपयांना विकली. ही साखळी पुढे राजस्थानपर्यंत पोहोचली, जिथे एका अंदाजित प्रश्नपत्रिकेच्या नावाने त्याचे वितरण करण्यात आले. नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता महाराष्ट्राच्या शिक्षण पंढरी समजल्या जाणाऱ्या लातूरपर्यंत पोहोचले आहेत. लातूर पोलिसांनी आतापर्यंत सहा जणांचे जबाब नोंदवले आहेत. एका खाजगी क्लासने घेतलेल्या सराव परीक्षेत तब्बल ४२ प्रश्न प्रत्यक्ष नीट परीक्षेतील प्रश्नांशी जुळत असल्याचा दावा एका पालकाने तक्रारीत केला आहे. या हस्तलिखित पेपरची निर्मिती कोणी केली आणि तो कोठून आला, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी खासगी क्लासेसची सखोल चौकशी सुरू केली आहे.

मुख्य आरोपी शुभम खैरनार याच्या नाशिकमधील भाड्याच्या घरावर आणि नांदगावमधील मूळ घरावर सीबीआयने छापे टाकले. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या झडतीत मोबाईल फोन, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक्स पुरावे जप्त करण्यात आले आहेत. शुभमच्या कुटुंबाची गुन्हेगारी पार्श्वभूमी देखील तपासली जात असून, त्याच्या भावालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. विचारपुस केल्यानंतर मात्र त्याला सोडून देण्यात आले.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने आणि एनटीएने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यामागे काही प्रमुख तथ्ये कारणीभूत ठरली आहेत. त्यात राजस्थानमधील अंदाजित प्रश्नपत्रिका सीकरमध्ये परीक्षेपूर्वी ४१० प्रश्नांचा एक संच अंदाजित प्रश्नपत्रिका म्हणून वितरित झाला होता. या संचातील १२० ते १३५ प्रश्न प्रत्यक्ष नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेशी जसेच्या तसे जुळले होते. सर्वाधिक प्रश्न रसायनशास्त्र या विषयाचे होते. तपासातील प्राथमिक पुराव्यांवरून ही केवळ योगायोग नसून नियोजित प्रश्नपत्रिका फुटल्याचे स्पष्ट झाल्याने परीक्षा रद्द करण्यात आली. अटक केलेल्या सर्व आरोपींना दिल्लीतील विशेष न्यायालयात हजर केले जाणार आहे. सीबीआय त्यांच्या कोठडीची मागणी करणार आहे. देशभरातील २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले असून, सरकार लवकरच पुनर्रचनेत असलेल्या नवीन परीक्षेच्या तारखा जाहीर करण्याची शक्यता आहे.

### लघुशंकेला गेला आणि तिकडेच पसार झाला

मोगा मुसळदे याने लघुशंकेचा बहाणा केला. त्याला कार्यालयाच्या मागील बाजूस घेऊन गेले असता तेथील कंपाऊंडवरुन उडी टाकून तो फरारी झाला. त्याचा पाठलाग अयशस्वी ठरला. निरीक्षक देविदास नेहुल यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सांगवी पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. खरेच काय घडले : केवळ दोन जण तीन आरोपींना का घेऊन जात होते, रात्री आरोपींची वाहतूक करण्याचे कारण काय, आरोपीला हाडाखेड कार्यालयातील मुतारीत का नेले नाही असे अनेक प्रश्न या प्रकरणात उपस्थित झाले आहेत. वरिष्ठांनी या प्रकरणाची कसून चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

### दहा किलो चांदीची चोरी; चोरटा साहित्य टाकून पळाला

साहित्य सुखरूप मिळून आले.चोरीचा प्रयतक फसला असला तरी, 'हायटेक' वाहनापर्यंत पोहोचणारा तो चोरटा नक्की कोण? याबाबत कापडणे गावात तर्क-वितर्क लढवले जात आहेत. केवळ पोलिसांच्या आणि श्वान पथकाच्या भीतीमुळे हा मुद्देमाल परत मिळाल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे.

### रखवालदार ते भाजी विक्रेत्याची लेक झाली डॉक्टर

अश्रू अनावर आले. मात्र मुलीची जिद्द चिकाटी पाहून वडिलांनीही वैद्यकीय शिक्षण घेण्यास तयारी दर्शवली.

यावेळी वडील गुमान पावरा यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, गरीबीशी झुंज देत मुलीला शिकवलं, आज ती डॉक्टर झाल्याचा अभिमान आहे. कष्टाचं चीज झालं, आता तिच्या यशाने आयुष्य सार्थक झालं. तर डॉक्टर मीनाने सांगितले की, अभ्यासासाठी रात्री उशिरापर्यंत मेहनत, सुट्ट्यांमध्ये पालकांना मदत करणे, तरीही शिक्षणात सातत्य राखणे, यामुळेच मला यश मिळाले, परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षणाच्या जोरावर यश मिळवता येते अशी प्रतिक्रिया दिली. लेक डॉक्टर झाली. आपल्या कष्टाला फळ मिळाले या खुशीतून आई सुमनबाई व वडील गुमान पावरा यांनी गावंभर पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

### सोनगीरच्या चोरीत दोन लाखांचे ऐवज लंपास

मशिदीत नमाज अदा करण्यासाठी घराचा दरवाजा बाहेरून लावून गेले होते. यावेळी त्यांची पतकी व मुलगा घरात झोपलेले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी दाराची कडी उघडून आत प्रवेश केला. घरातील पत्र्याच्या कपाटातून चोरट्यांनी दागिन्यांसह रोकड घेऊन पोबारा केला. विशेष म्हणजे, घरात माणसे झोपलेली असतानाही चोरट्यांनी इतक्या शिताफीने चोरी केली की कोणालाही याचा सुगावा लागला नाही. सकाळी ११ वाजता जेव्हा अजीम शेख यांनी कपाट उघडले, तेव्हा हा चोरीचा प्रकार उघडकीस आला.घटनेची माहिती मिळताच सोनगीर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सायंकाळी पाचारण करण्यात आलेल्या श्वान पथकाने मण्यार गल्लीतून हस्ती बँकेच्या इमारतीपर्यंत माग काढला. यावरून चोरटा याच मार्गाने पसार झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. दरम्यान,अजीम शेख यांच्या रोजच्या वेळापत्रकावर पाळत ठेवूनच हे कृत्य केले असावे, अशी चर्चा परिसरात सुरू आहे. सोनगीर पोलिस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली असून, पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा कसून शोध घेत आहेत.

### ... पत्नीच्या खून प्रकरणी पतीस पाच वर्षांची शिक्षा

यांनी सरकार पक्षातर्फे १२ महत्वाच्या साक्षीदारांच्या साक्षी नोंदविल्या त्यात पंच साक्षीदार, घटनास्थळ पंच, साक्षीदार, डॉक्टर, कॅरियर, तपासी अंमलदार असे होते. यामध्ये डॉक्टर यांची यांची साक्ष में. न्यायालयात महत्वाची ठरली तसेच सदरच्या खटल्यात सरकारपक्षातर्फे युक्तीवाट करतांना अति सरकारी अभियोक्ता श्रीमती अजय शंकरराव सानप, यांनी साक्षीदारांच्या साक्ष व त्या अनुषंगाने केलेला युक्तीवादाचा आबार घेत आरोपीला जास्तीत-जास्त शिक्षा देण्याचा युक्तीवाद केला. सदर कामात मे. सत्र न्यायमुर्ती श्रीमती. जे. आर. पुलाटे साो. यांनी सर्व बांबीचा सांगोपांग विचार करुन आरोपीस भा.द.वि. ३०४ भाग २ अन्वये ५ वर्षांची शिक्षा व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनवली व तो दंड न भरल्यास एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. सदर कामी सरकार पक्षातर्फे अजय शंकरराव सानप यांनी काम पाहिले, तसेच त्यांना जिल्हा सरकारी वकील श्री. देवेंद्रसिंह योगेंद्रसिंह तंवर यांचे मार्गदर्शन लाभले.

### शिंदखेडा न.पंचायत सर्वसाधारण सभा संपन्न

गाळयांच्या भाडे वसुली, विविध ठिकाणी काँक्रीट रस्ते, गटार व पथदिवे बसविण्याचे काम समाविष्ट आहे.अपूर्ण माहितीमुळे मंजूर करण्यापूर्वी अधिक तपशील आवश्यक असल्यामुळे सोलर एलईडी कामाची प्रक्रिया, कम्युनिटी हॉल बांधकाम, प्रभागातील सार्वजनिक शौचालय बांधकाम यांसारखी कामे पुढील सभेस स्थगित ठेवण्यात आली. तर बहुमताने नामंजूर झालेले विषय पाणीपुरवठा योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी बदलणे आणि भुयारी गटार योजनेसाठी बदलण्याचे प्रस्ताव बहुमताने नामंजूर करण्यात आले.सभेत सदस्यांनी शहराच्या विकासासाठी महत्वाच्या कामांवर ठोस मत व्यक्त केले, तसेच काही प्रस्ताव पुढील तपासणीसाठी स्थगित ठेवण्यात आले. नागरिकांच्या सोयीसाठी रस्ते, सार्वजनिक शौचालये, ओपन स्पेस, जलकुंभांची नावे आणि नगरपंचायतीच्या वाहतुकीसाठी उपाय योजना पुढील कामकाजात येणार आहेत.राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली.त्या नंतर सेवानिवृत्त होत असलेले नगर पंचायत कर्मचारी इलेक्ट्रिशियन अशोक माळी यांचा सत्कार पुष्पहार, शाल व नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने एक मोमेंटो देऊन करण्यात आला यावेळी नगराध्यक्षा श्रीमती कलावती माळी,उपनगराध्यक्ष उदय देसले सह सर्व नगरसेवक नगरसेविका तसेच मुख्याधिकारी श्रीकांत फागणेकर प्रशासकीय अधिकारी सचिन वाघ, गणेश पवार राजेंद्र डांगरीकर व इतर कर्मचारी उपस्थित होते.

### नवी अंतुर्लीला घरफोडी

शिरपूर, दि.१३ (का.प्र.) : तालुक्यातील नवी अंतुर्ली येथे मजुराच्या घरात १२ मे रोजी रात्री घरफोडी करुन चोरट्यांनी ४४ हजार ५५० रुपये किंमतीचे सोनेचांदीचे दागिने चोरुन नेले. याबातची फिर्याद विलास देविदास ईशी (वय ३६) यांनी दिली आहे.

**पाहिजेत**
होलसेल मेडिकल मध्ये कामासाठी मुले/पुरूष/महिला पाहिजेत.
१) कॉम्प्युटर आपरेटर
२) सेल्समन बाहेरगावांसाठी
३) मदतनीस
-: संपर्क :-
8483032975
9823716975

**पाहिजेत**
FMCG Distributor मध्ये डिलिव्हरीसाठी इंग्रजी वाचता लिहता येणारे डिलिव्हरी बॉय, ड्रायव्हर पाहिजेत.
पत्ता - अग्रसेन चौकजवळ, धुळे
8767674975

**ड्रायव्हर पाहिजेत**
गॅस सिलेंडर वितरण करण्यासाठी फोर व्हिलर अनुभवी ड्राईव्हर पाहिजे.
पगार - १०,०००/- १५,०००/-
मंजुश्री गॅस एजंसी
साक्री रोड, धुळे
अमित जावळे
7517568927

**पाहिजेत**
धुळे एस टी स्टँडवरील पे अँड पार्किंग साठी बिलिंग मशीन ऑपरेटर, व दुचाकी वाहने लावण्यासाठी होतकरू कर्मचारी त्वरीत पाहिजेत. आकर्षक पगार
-: संपर्क :-
9172676376

**ड्रायव्हर पाहिजे**
कार चालविण्यासाठी अनुभवी कायमस्वरुपी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
-: संपर्क :-
9823178279

**चालविण्यास देणे आहे**
धडगाव जि.नंदुरबार बस स्थानकात हॉटेल व्यवसायासाठी/ व्यवस्थापक चालविण्यास देणे आहे.
-: संपर्क :-
9404576771

**चालविण्यास देणे आहे**
धुळे शहरातील मध्यवर्ती बस स्थानकातील मेन्स पार्लर दुकानासाठी कारागिर, व्यवस्थापक चालविण्यास देणे आहे.
-: संपर्क :-
राजु भावसार फेटेवाले
9404576771

**पाहिजेत**
माता हिंगलाज न्युज चॅनलसाठी वृत्त निवेदक-२, प्रतिनिधी-रिपोर्टर-२ धुळे/नंदुरबार व्हिडीओ ईडीटर - २
-: संपादक :-
राजु भावसार फेटेवाले
ग.नं.४, धुळे
9422286386
9404576771

**पाहिजेत**
होंडा कंपनीचे जनरेटर रिपेअरिंगसाठी कारागीर पाहिजे.
इलेक्ट्रीशियन - २
वेल्डर - २, पेंटर - २
-: संपर्क :-
राजु भावसार फेटेवाले
ग.नं.४, धुळे
9422286386
9404576771

**पाहिजेत**
कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच ॲण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

**अनारसे**
खास अधिक मासा साठी उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील नोंदणी आवश्यक आहे.
अनारसा पिठ उपलब्ध आहे.
मदर्स किचन
फूलवाला चौक,धुळे
9049902201
7887750864

**विकणे आहे**
रामचंद्र नगरला लागुन दोन रस्त्यांच्या कॉर्नरचा ४००० स्केअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
सुरेश चौधरी
9422286235

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
कामासाठी माणुस लावणे आहे.
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
पारोळा रोड, प्रकाश टॉकीज समोर, धुळे
-: संपर्क :-
9423135555

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर कामासाठी माणूस पाहिजे.
-: संपर्क :-
पत्ता : ग.नं.५, हिंदुएकता चौक, धुळे
9404344999
9588418856

**WANTED**
Require 2 Pharmacist
Part or Full Time
Gents or Ledies
9823833108

**पाहिजेत**
ओमश्री अग्रो टेक प्रा. लि.
जी-३२ एम. आय. डी. सी. अवधान धुळे
(सोयाबीन सॉल्व्हंट एक्सट्रॅक्शन)
या कंपनीत खाली दिलेल्या पदांची त्वरीत नेमणूक करण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी खालील मेलवर अर्ज करावा.
१) आवक/जावक लिपीक/ गोडावून सुपरवायझर
२) प्रेप ऑपरेटर
३) असिस्टंट प्रेप ऑपरेटर
४) प्रेप हेल्पर
५) वर्कशॉप फिटर
६) वर्कशॉप हेल्पर
७) इलेक्ट्रीशियन (वायरमन)
८) केमिस्ट
९) बॉयलर अटेन्डंट- ग्रेड १
१०)माळी (बागकाम करणारा)
वरील सर्व पदाकरीता किमांन ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तरी इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत आपलाअर्ज E-mail- omshree_sep@rediffmail.com वर पाठविणे.

**पाहिजेत**
सलुन दुकान कामासाठी चांगला होतकरु कारागीर पाहिजेत.
-: संपर्क :-
दसेरा मैदान, मालेगाव रोड, धुळे
9422289047

**पाहिजे**
धुळ्यामध्ये माल वाटपासाठी माणूस/ मुलगा पाहिजे.
लिहता, वाचता आणि हिशोब करता येणे आवश्यक.
लाईफ लाईन बेकरी
मालेगाव रोड, धुळे
8999961619

**गुरुकृपा पेपर्स**
आमच्याकडे सर्व कंपनीचे झेरॉक्स पेपर, कलर पेपर, बॉन्ड पेपर, लेजर पेपर, फोटो पेपर, लॅमिनेशन शिट, स्पायरल शिट, ओ.एच.पी, ऑफिस फाईल, पट्टी फाईल, लॅमिनेशन मशिन व स्पायरल मशिन योग्य दरात मिळेल.
B2b A4 - 2050 Box
गुरुकृपा पेपर ॲन्ड झेरॉक्स
बँक ऑफ महाराष्ट्र देवपूर शाखेसमोर
पंचवटी देवपूर धुळे
7620455630 / 9421471926

**मनमाड इंदौर रेल्वे मार्ग व नॅशनल हायवे जवळ असणारा प्लॉट विकणे आहे**
मनमाड इंदौर रेल्वे मार्ग व सुरत नागपूर नॅशनल हायवेचा फागणे परिसराचा विकास झपाट्याने होत आहे. फागणे सौंदाणे रोडवर एकाच ठिकाणी व एकाच व्यक्तीच्या मालकीचा ३० (तीस) लाख चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: वैशिष्ट्ये :-
प्लॉट जवळ धरण असल्यामुळे मुबलक पाणी मिळेल.
धुळे शहरापासुन पंधरा मिनीटात पोहचणे शक्य. फागणे रेल्वे स्टेशनला जवळ.
मुंबई आग्रा महामार्गाकडून धुळे बायपासने पंधरा मिनीटात पोहचणे शक्य.
भरपूर ऑक्सिजन देणारा परिसर असल्याने ले-आऊट टाकण्यासाठी उपयुक्त.
भव्य मालाचा डेपो (सेंट्रल गोडावून) साठी उपयुक्त.
शाळा कॉलेजच्या कॅम्पसाठी उपयुक्त अशी जागा विकणे आहे.
सुयश गोल्डन सिटी
फागणा, धुळे-४२४३०१
परिवार फागणा सौंदाणे रोड
फागणा, मुंबई वाल्यांचा मळा
09867385827
09930454253

**कुलिंग इंडिया की पहचान**
Symphony | Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'

आता खरेदी करा कूलर ०% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०